प्रकरण तिसरे

# पानिपतच्या संग्रामाचे स्वरुप, कारणे व दुष्परिणाम

- पानिपतच्या संग्रामाचे स्वरुप
- पानिपतच्या युद्धाची कारणे–
- पानिपतच्या युद्धाचे दुष्परिणाम
- निष्कर्ष
- तळटीपा

विश्वास पाटील यांच्या व्यक्तीगत जीवनाची जडणघडण कशी झाली याचा विस्तृत आढावा घेतल्यानंतर तिसऱ्या प्रकरणात पानिपतच्या युद्धाचे स्वरुप, कारणे व दुष्परिणाम यांचा अभ्यास करावयाचा आहे.

हिंदुस्थानच्या इतिहासात ज्या महत्त्वाच्या लढाया झाल्या त्यात पानिपतच्या तिन्ही लढाया सामील आहेत. या लढायामुळे राजवटी बदलल्या. मराठ्यांच्या इतिहासात तर १४ जानेवारी १७६१ रोजी घडून आलेल्या तिसऱ्या पानिपत युद्धास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या लढाईमुळे नराठी सत्तेवर मोठी गंडांतरे आली. या युद्धात अनेक मराठ्यांनी हौतात्म्य पत्करले. नाणीखुर्दा किती गेला याचा पत्ताच नाही. ही लढाई नुसती मनुष्यहानी करुन थांबली नाही तर तात्पुरती का होईना पण या पराभवाने मराठ्यांची हिंदुस्थानावरील पकड ढिली झाली. त्यामुळे निव्वळ महाराष्ट्राचाच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानचा इतिहास पालटला. पुढील काळात पहिल्या माधवरावांनी आपल्या अकरा वर्षाच्या कारकिर्दीत मराठी राज्याची विस्कटलेली घडी बसविण्याचा प्रयत्न केला, तरी मराठी सत्ता पूर्णपणे सावरु शकली नाही. या युद्धात अहमदशहा अब्दालीला विजय मिळाला. तथापि त्याने दिल्लीची सत्ता ताब्यात न घेता तोही हिंदुस्थानातून कायमचा मायदेशी निघून गेला. रघुनाथराव दादाने उत्तर मोहिमेत केलेल्या चुका, नजीबखानास मल्हारराव यांच्या सांगण्यावरुन दिलेले जीवदान, मराठ्यांची पंजाबातून पिछेहाट, राजपूत–जाट यांचेशी पत्करलेले वैर, उत्तर मोहिमेत केलेली हिंदू–मुस्लीमांची लूट, या घटनांच्या पार्श्वभूमीवर मराठ्यांचा युद्धातील व राजकारणातील दूरदृष्टीचा दोष जाणवतो. त्यादृष्टीने पानिपतची पार्श्वभूमी लक्षात घेणे जरुरीचे आहे.

छत्रपती शाहूंच्या निधनानंतर मराठी राज्याचा कारभार पेशव्याकडे आला. 'सांगोला' करारानुसार पेशवे दौलतीचे (मराठी राज्याचे) मुख्य कारभारी म्हणून काम पाहू लागले. सातारा राजधानी मागे पडली व पुणे राजधानीचा अधिक बोलबाला झाला.

नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठी सत्ता अटकेपार होऊन पेशावरपर्यंत पोहोचली. ही मराठी माणसाला अभिमानास्पद अशीच गोष्ट होती. रघुनाथराव दादा हा नानासाहेब पेशव्यांचा लहान भाऊ. तो पेशव्यांच्याच हुकुमाने दोनदा उत्तर हिंदुस्थानच्या स्वारीवर गेला होता. मात्र पेशव्यांनी सोपविलेली कामगिरी त्यास पार पाडता आली नाही. उलट मोहिमेचा खर्च वाढून मराठी राज्यावर त्याने कर्ज केले. रघुनाथराव दादा यांची दुसरी मोहिम प्रामुख्याने अहमदशहा अब्दाली व त्याचा हस्तक नजीबखान यांच्या बंदोबस्तासाठी होती. मात्र हाती आलेल्या नजीबखानास मल्हारराव होळकरांच्या सांगण्यावरुन सोडून देण्यात आले व अब्दालीचाही बंदोबस्त त्यांच्या हातून झाला नाही. उलट नजीबखानाची दिल्लीवरील पकड अधिक घट्ट झाली. रघुनाथराव दादांची अपूर्ण कामगिरी पूर्ण करण्याची जबाबदारी पेशव्यांनी शिंदे–होळकरांवर सोपविली. हिच कामगिरी पूर्ण करताना दत्ताजी शिंदे याला प्राणार्पण करावे लागले. शिंदे यांच्या पराभवामुळे नजीबखान व अब्दालीचे सामर्थ्य दुप्पटीने वाढले तर दत्ताजीच्या मृत्यूने मराठी राज्याचे न भरुन येणारे नुकसान झाले.

दत्ताजीच्या मृत्यूची बातमी जेंव्हा दक्षिणेत पोहोचली तेंव्हा मराठी मुलखात खूपच खळबळ माजली. मराठ्यांना नजीबखानाचा बंदोबस्त हेच मोठे आव्हान वाटू लागले. यावेळी उद्गीरच्या लढाईत विजय मिळाल्याने सगळेजण आनंदात होते. मराठी सत्तेच्या दृष्टीने हा खरा वैभवाचा काळ होता. तेवढ्यात हे अघटित घडले. हे अघटित घडण्याचे प्रमुख कारण म्हणजे मराठ्यांनी दिल्ली बादशहाशी केलेला ''अहमदिया करार'' होय.

उत्तरेतील मुघल बादशाही दुर्बल झाल्यानंतर पठाणी व इतर सत्तेपासून दिल्लीचा बचाव करण्यासाठी २३ एप्रिल १६५२ ला मराठ्यांशी दिल्ली बादशहाने कनोज येथे करार केला. या करारानुसार दिल्लीच्या बादशाहीचे परकियापासून मराठ्यांनी संरक्षण करावे. त्या मोबदल्यात मराठ्यांना चौथाई देण्याचा करार झाला. हाच करार 'अहमदिया करार' म्हणून ओळखला जातो. याच करारामुळे दिल्लीच्या

राजकारणात मराठे गुंतले. या कराराच्या पुर्ततेसाठी मराठ्यांची संपूर्ण एक पिढी पानिपतच्या रणांगणावर गारद झाली.

दत्ताजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर 'अहमदिया करारा'नुसार उत्तरेतील विस्कटलेली घडी नीट बसवावी या उद्देशाने उत्तर मोहिम भाऊवर सोपविण्यात आली. भाऊंना पावसाळ्यापूर्वीच ही मोहिम आपण उरकू असा अंदाज होता मात्र, अनेक अडचणींना त्यांना तोंड द्यावे लागले व शेवटी पानिपतच्या भूमीत हौतात्म्य पत्करावे लागले. युद्धाचे वर्णन वाचतानाच हे युद्ध किती क्लेशकारक होते याची प्रचिती येते. या युद्धाचे स्वरुप, कारणे व युद्धामुळे झालेले दुष्परिणाम यावर आपण पुढील मुद्यात चर्चा करणार आहोत.

■ **पानिपतच्या संग्रामाचे स्वरुप :–**

पानिपतच्या युद्धाची पार्श्वभूमी लक्षात घेतल्यानंतर पानिपतच्या संग्रामाचे स्वरुप लक्षात घेणे उचित ठरते, कारण मराठ्यांच्या इतिहासातील समोरासमोर झालेले सर्वात मोठे हे युद्ध आहे. या युद्धाचे स्वरुप इतर मराठ्यांच्या युद्धापेक्षा संपूर्णतः भिन्न स्वरुपाचे आहे. हे युद्ध परकीय लुटारु व ऐतद्देशीय यांच्यातील होते. मात्र युद्धाला धर्माचे स्वरुप आणून ऐतद्देशीय मुसलमानांनी व इतर सरदारांनी मराठ्याविरुद्ध कंबर कसली. सुरुवातीपासून भाऊसाहेबांनी हे युद्ध परकीय शत्रूला हिंदुस्थानातून घालविण्यासाठी असून उत्तरेतील सर्व राजे सरदारांना एकत्रित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मात्र या अगोदरचे मराठ्यांचे धोरण चुकल्यामुळे भाऊंना कुणाचीच मदत झाली नाही. एकटा जाट राजा भाऊंच्या मदतीला आला मात्र अंतर्गत कलहामुळे तो ही रातोरात पळून गेला.

भाऊसाहेबांना सुरुवातीपासूनच अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. अनेक सोबत्यांना दुःखवायचे नव्हते म्हणून त्यांच्याकडून ठरलेल्या खंडण्या घेता आल्या नाहीत. याशिवाय निसर्गाची ही साथ मिळाली नाही. पिकावर तांब्रा पडला. घोड्यास व बैलास अनेक रोग झाले. नेहमीपेक्षा पाऊस अगोदर पडला.

त्याचप्रमाणे कुंजपुऱ्याचा विजय मिळाल्यानंतर अब्दालीने भरली यमुना ओलांडली आणि मराठ्यांच्या नशिबी आधी निश्चित न केलेले रणांगण आले. याउलट रोहिले आपल्या प्रदेशाच्या जवळ आले. मराठे हिंदूप्रदेशापासून अधिक दूर गेले. रणांगण दिल्लीच्या दक्षिणेस असते तर मराठ्यांस हितकर ठरले असते मात्र कुरुक्षेत्राच्या मोहाने मराठ्यांनी ती संधी कायमची गमावली. धान्य येऊ शकणारा सुपीक प्रदेश शत्रूच्या पाठीवर आला आणि रोहिल्यांनी निम्मे युद्ध जिंकले.

युद्धशास्त्रीय दृष्टीने विचार करता मराठ्यांचे गोट मैलामैलाच्या अंतराने पसरल्याने दोन गोटातील लोकांची चार–सहा दिवसांनी भेट होई. याचा परिणाम वेगवेगळ्या गोटात वेगवेगळ्या बातम्या उठत व त्या सगळीकडे पसरत. शिंदे–होळकरांच्या फौजेचा खर्च त्यांच्या स्वतंत्र जहागिरीतल्या उत्पन्नातून चालत. याउलट गोविंदपंतांच्या मृत्यूनंतर भाऊंच्या फौजेवर सर्वात अगोदर अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. भाऊंच्या सैन्याच्या हलाखीमुळेच भाऊ दुसऱ्या दिवशी युद्ध करण्याचे ठरवितो तर शिंदे–होळकर आणखी चार दिवस थांबावे या विचारात होते.

गोविंदपंत जिवंत होते तोपर्यंत रोहिल्यांच्या फौजेत अनेक गोष्टींची चणचण होती. तर मराठ्यांना १७ आक्टोंबर १७६० च्या कुंजपुऱ्यातील विजयामुळे भक्कम लूट मिळाली होती. या युद्धात १० हजार अफगाण मारले होते. गोविंदपंतांनी अब्दालीच्या फौजेला मिळणारी रसद तोडल्याने व कुंजपुऱ्याचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात गेल्याने बादशहाने अताईखानास ५ हजार घोडदळ देऊन गोविंदपंताचा काटा काढण्यास सांगितले. गोविंदपंताच्या मृत्यूनंतर मराठी फौजेचे खूप हाल झाले. त्यातच डिसेंबर–जानेवारी हे कडक थंडीचे महिने असल्याने कडक थंडीने अनेक माणसे, घोडी, बैल मरुन गेले. गोविंदपंतांच्या मृत्यूनंतर मारठ्यांची अंतर्वेदीतून येणारी रसद पूर्णपणे बंद झाली. दरम्यान दिलेरखान रोहिल्याने कुंजपुऱ्यावर हल्ला करुन तो किल्ला ताब्यात घेतला त्यामुळे मराठ्यांना पंजाबातून येणारी रसदही बंद पडली. मराठ्यांचा पत्रव्यवहारही अब्दालीने पूर्णपणे अडवून धरला. डिसेंबरच्या अखेरीस तर मराठ्यांची पूर्णपणे कोंडी करण्यात अब्दाली यशस्वी झाला. अन्नधान्य संपले. पैसाही संपला. बाहेरुन येणारी रसदही

बंद झाल्याने सैन्याची उपासमार होऊ लागली. चाऱ्याविना जनावरे पटापटा मरु लागली. थंडी अनावर झाल्याने लाकडे गोळा करण्यास गेलेल्या २० हजार निशस्त्र मराठ्यांना अब्दालीच्या गस्त घालणाऱ्या ५ हजार शस्त्रधारी सैन्याने कापून काढले. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी मराठ्यांकडे जाडजूड कपडे नव्हते तर रोहिल्याकडे तसे कपडे व पादत्राणे होती. याशिवाय मुबलक दारुगोळा, घोडी, बैल यांचा मराठ्याकडे तुटवडाच होता. खजिना संपल्याने भाऊसाहेबांनी जवळ असणाऱ्या सोन्या–चांदीची नाणी पाडली पण तीही पंधरा दिवसात संपली. डिसेंबर महिन्यात अब्दालीने आपल्या छावणीची जागा तीनवेळा बदलली. तर मराठे अडीच तीन महिने एकाच जागी होते. त्यातच मेलेली जनावरे, जनावरांचा मलमूत्र. त्यामुळे अनेक रोगांचा फैलाव झाला त्यामुळे जनावरे व सैन्य रोगराईने मरुन गेले. त्यातच दिलेरखानाने कुंजपुऱ्याजवळ कालवा फोडून मराठ्यांना पाण्यासाठी महाग केले.

अन्नाविना मरण्यापेक्षा शत्रूशी लढतालढता मेलेले बरे असे सर्वांना वाटू लागल्याने १० जानेवारीस मकरसंक्रांतीचा सण साजरा केला. १३ जानेवारी १७६१ रोजी भाऊसाहेबांनी प्रमुख सरदार व सेनापतीची बैठक बोलाविली व युद्धाचा अंतिम निर्णय घेतला. यात युद्ध कोणत्या पद्धतीने खेळायचे यावर बरीच चर्चा होऊन शेवटी गोलाची लढाई करायची व शत्रूची फळी फोडून दिल्ली गाठायची असा निर्णय झाला.

१४ जानेवारी १७६१ रोजी मराठ्यांनी आपला तळ हालविला. सैन्याची रचना लंबगोलाकार होती. सैन्याची लांबी तीन मैल व रुंदी दीड मैल असावी. अब्दालीची सैन्यरचना चंद्रकोरीची होती. ती सात मैल लांब होती.

मराठी सैन्याच्या आघाडीस मराठ्याचा प्रभावी तोफखाना व मराठी गारद्यांची नऊ पथके होती. स्वतः डाव्या बाजूला इब्राहिमखान आपल्या ७ हजार गारद्याबरोबर. त्यांना लागूनच दमाजी गायकवाड २ हजार घोडेस्वार व विठ्ठल शिवदेव १५ हजार घोडेस्वाराबरोबर. मध्यभागी अनेक लहानमोठे सरदार २००० घोडेस्वारासहित. भाऊसाहेब, विश्वासराव १३,५०० ची हुजूरात फौज व बळवंतरावांचे सैन्य घेऊन. उजव्या बाजूला अंताजी माणकेश्वर, सटवाजी जाधव व लहानमोठे सरदार २५०० घोडदळाबरोबर

त्यांना लागून समशेरबहाद्दर १५०० पायदळासहित, उर्वरित ७००० शिंदेचे व ३००० मल्हारराव होळकरांचे सैन्य. आघाडीच्या सैन्यामागे स्त्रिया, मुले, बिनलढाऊ लोक होते. त्याच्या पाठीमागे शिंदे व होळकरांच्या संरक्षण करणाऱ्या तुकड्या होत्या.

याउलट डाव्या बाजूला शहापसंद ५ हजार घोडदळासहित, त्याला लागूनच दिल्लीच्या राजरस्त्यावर आपल्या १५ हजार प्यादयाबरोबर नजीबखान, बाजूलाच ३००० घोडदळासहित सुजाउदौला, मध्यभागी शहावलीखान १९ हजार घोडदळाबरोबर, शहावलीच्या बाजूस अताईखान दुंदेखान, फैजुल्लाखान, सादुल्ला, बरेलीकर अहमदखान बंगष १५ हजार घोडदळासहित. बरखुरदारखान व अमीरबेग तीन हजार काबुली पायदळ व तोफखान्यासहित इब्राहिमखान गारद्याच्या समोर. सेनापती जहानखान वजीराच्या मदतीसाठी आपल्या निवडक १० हजार सैन्याबरोबर शहावलीच्या पाठीमागे. अशा प्रकारे दोन्ही सैन्याची रचना होती.

■ **रणसंग्राम :–**

१४ जानेवारी १७६१ राजी सकाळी ९ वाजता प्रत्यक्ष युद्धास सुरुवात झाली. सुरुवातीला मराठ्यांनी निकराने हल्ला चढवून अब्दालीच्या सैन्यात गोंधळ उडवून दिला. इब्राहिमखानाने जोरदार हल्ला करुन पहिल्या एका तासात ९ हजार रोहिले पठाणांना यमसदनी पाठविले. सदाशिवभाऊ व विश्वासराव यांच्या नेतृत्वाखालील हुजुरातीने शहावलीखानावर निकराचा हल्ला चढवून त्यास १ मैल मागे रेटले. इब्राहिमखानाच्या तोफखान्यामुळे समोरील रोहिल्यांच्या फळीत खिंडार पडले. परंतु गोलाच्या लढाईचे तंत्र न समजल्याने दमाजी गायकवाड व विठ्ठल शिवदेव यांचे सैन्य पुढे घुसले. त्यामुळे इब्राहिमखानचे तोफगोळे मराठी सैन्यावर पडू लागल्याने तोफखाना बंद करावा लागला. ज्या तोफांची अब्दालीच्या सैन्यांनी धास्ती खाल्ली होती तो तोफखाना बंद पडल्याने पळण्याच्या तयारीत असणारे सर्व रोहिले, पठाण मागे फिरले. आणि त्यांनी फळी होती तशी पूर्ववत केली.

पुन्हा मराठ्यांनी निकराने हल्ला चढवून अताईखान व त्याचे ३ हजार सैन्य मारुन टाकले. वजीराच्या फौजेचा धीर खचून ती मागे पळू लागली तेंव्हा अब्दालीने वजीराच्या मदतीला जहॉनखान यास १० हजार सैन्याच्या तुकडीबरोबर पाठवून कमी झालेल्या व पळून गेलेल्या सैन्याची पोकळी भरुन काढली. सदाशिवभाऊ, विश्वासराव, इब्राहिमखान गारदी, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, जनकोजी शिंदे यांनी जीवावर उदार होऊन अब्दालीच्या सैन्यावर प्रखर हल्ला केला. दुपारी दोनपर्यंत मराठी सैन्याची सरशी होती. मात्र यावेळी सूर्याचे दक्षिणायन असल्याने मराठी सैन्याच्या डोळ्यावर सूर्याची किरणे पडू लागली. त्यातच अनेक दिवसापासून पोटभर अन्न–पाणी न मिळाल्याने घोडी माणसे पाणी–पाणी करुन आपोआप पडू लागली. या संधीचा अब्दालीने बरोबर फायदा घेतला त्याने राखीव तुकड्या व उंटावरील तोफखाना पुढे करुन जोरदार हल्ला करण्यास प्रारंभ केला. एवढ्यात विश्वासराव यांना गोळी लागून ते ठार झाले. विश्वासराव पडल्याची बातमी सैन्यात वाऱ्यासारखी पसरल्याने मराठी सैन्याचे मनोबल खचले. विश्वासरावांच्या मृत्यूने सदाशिवरावभाऊ हत्तीवरुन घोड्यावर येऊन लढू लागले. विश्वासरावांच्या मृत्यूनंतर विठ्ठल शिवदेव व दमाजी गायकवाड यांच्या गुलामांनी डोक्याची लाल वस्त्रे सोडून 'मराठे हार गये... मराठे हार गये' असा गिल्ला केला व सैन्याला लुटू लागले. मराठी सैन्याला वस्तुस्थिती न समजल्याने मराठी सैन्याचा धीर खचला व ते पळू लागले. मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव, नाना पुरंदरे इत्यादी सरदारांनी पळणाऱ्या सैन्याबरोबर दिल्लीकडे पळ काढला. त्याबरोबर उरलीसुरली मराठी फौज क्षणार्धात मोडली. यात मराठ्यांचा पूर्ण पराभव झाला.

विजयी अफगाण सैन्यांनी मराठी फौजेचा चाळीस मैलापर्यंत पाठलाग केला. पुण्यसंचय करण्याच्या उद्देशाने युद्धातून पळालेल्या मराठी सैन्याची, यात्रेकरुची, बायकामुलांची डोकी कापली, युद्धाचा निकाल पहिल्याच दिवाशी लागला असला तरी दुसरे दोन दिवस पळणाऱ्या सैन्याची लूट व कत्तल सुरु होती. ही लूट व कत्तल इतकी भयाण होती की दया, क्षमा, माणुसकी या शब्दांना कसलाच अर्थ राहू नये. एक मुसलमान लेखक पानिपतच्या युद्धानंतर आठ महिन्यांनी लिहतो. – ''मराठ्यांच्या छावणीतील १२ हजार

उच्च स्त्रिया गिलच्यांनी पकडल्या व ते घेऊन गेले. त्यातील ७०० स्त्रिया पालखीतून प्रवास करणाऱ्या होत्या.''[१] नाना फडणीसाची आई, बायको, बळवंतराव मेहेंदळे यांचा मुलगा अशी अनेक लहान मोठ्या सरदारांच्या स्त्रिया व मुले गिलच्यांनी धरुन नेल्या. युद्धानंतर पानिपत गावात पळून आलेल्या स्त्रियांना व मुलांना गिलच्याने गुलाम केले. यावेळी अनेक स्त्रियांनी विहीरी जवळ केल्या. पानिपत गावात पळून आलेल्या मराठे सैन्याला अब्दालीच्या सैन्याने एका रांगेत उभे केले. उपासमारीने सैन्य असमर्थ बनल्याने त्यांच्या हातावर चिमूटभर फुटाणे खाण्यासाठी ठेवण्यात आले. पिण्यासाठी भिस्त्यांच्या चामडी पोतडीतून आणलेले पाणी दिले व त्यांची डोकी खेळ समजून सपासप उडविण्यात आली. कित्येक रोहिल्यांनी आपल्या राहुटीसमोर अनेक मुंडक्यांच्या विजयदर्शक राशी घातल्या होत्या. अशा प्रकारचा निर्घृणपणा यापूर्वी कधीच घडला नव्हता. मुसलमान व पठाणांचे त्यावेळचे वागणेच इतके क्रूर होते की त्यात कोणताच नैतिक भाग नव्हता.

युद्धात इब्राहिमखान गारदी व जनकोजी शिंदे याला कैद करुन नंतर ठार करण्यात आले. तर सदाशिवभाऊ, यशवंतरराव पवार, संताजी वाघ, मनाजी पायगुडे, तुकोजी शिंदे, खंडेराव निंबकर इत्यादि मंडळी मरण पावली. समशेर बहाद्दर व अंताजी माणकेश्वर खूप जखमी झाल्याने रस्त्यात मरण पावले.

ऐन युद्धाच्या वेळी मराठ्याजवळ चाळीस हजार तरी सैन्य होते की नाही याबद्दल शंका वाटते. चाळीस हजारपैकी निम्या लोकांनीच शेवटपर्यंत लढाई पाहिली असेल? इतर सवड मिळताच रणांगणातून पळाले असावेत. पानिपतहून निघालेले सैन्य जेंव्हा ग्वालेरास पोहोचले तेंव्हा त्यांची संख्या १० हजार होती. यातील बहुतेक युद्धाला तोंड फुटल्यानंतर पळालेले असावेत. नाहीतर ते थोडेफार जखमी झाले असतेच! युद्धाच्यावेळी अनेक स्वारांची घोडी अगोदर मेल्याने त्यांना पादचारी होऊन लढावे लागले. साहजिकच अफगाणी तगड्या घोड्यापुढे पादचारी मराठी सैन्य खुजे पडले. अफगाण रोहिल्यांना पुरुन उरण्यासारखे फक्त इब्राहिमखान गारद्याचे सैन्य होते. त्यांच्याकडे फ्रेंच पद्धतीच्या बंदुका होत्या. या युद्धात त्या अधिक कार्यक्षम व नवीन होत्या. वजनाने हलक्या व उडवायला सोप्या होत्या. याशिवाय पुढे संगिनी

लावल्याने निकराचा हल्ला झाला तरी प्रतिकारक्षम होत्या. या युद्धात रोहिल्यांचे सर्वाधिक नुकसान व सैन्य मारले ते इब्राहिमखानच्या गारद्यांनी!

पानिपतच्या युद्धाचे स्वरुप पाहताना युद्धप्रसंगी वापरलेल्या शस्त्रास्त्रांचा विचार करणे उचित ठरते. त्यादृष्टीने पाहता मराठ्यांकडील तोफा आकाराने लहानमोठ्या होत्या. लहान तोफांना दोन बैल लागत तर मोठ्या तोफांना २०० बैल लागत. काही हत्तींनी ओढावयाच्या तोफा होत्या. त्यांचा उपयोग किल्यांच्या भिंती पाडण्यासाठी होत असे. हातघाईच्या लढाईत मोठ्या तोफांचा उपयोग होत नसे. इब्राहिमखानच्या तोफा युद्धाला तोड फुटल्यानंतर अर्ध्या तासाने बंद पडल्या त्याचा परत काहीच उपयोग झाला नाही. याऊलट अब्दालीच्या उंटावरील तोफखान्यामुळे मराठ्यांचे फारच नुकसान झाले.

बागपतावर भरली यमुना ओलांडली तरी मराठ्यांच्या प्रचंड तोफखान्यापुढे आपला निभाव लागणार नाही हे ओळखून अब्दालीने शांतवृत्तीने युद्धाचे डावपेच आखले व तो भाऊपेक्षा वरचढ ठरला. नद्या, नाले, डोंगर याचा पुरेपूर वापर करुन आपल्याला प्रतिकूल असणारी परिस्थिती अनुकूल करुन घेतली. महिनाभर आपली छावणी यमुना तीरावर हालवून मराठ्यांची रसद व बाह्य दळणवळण संपूर्णतः बंद करुन पानिपतच्या खंदकात त्यांना कोंडून ठेवण्यात यश मिळविले. सर्वच बाजूला शत्रूपक्षाचा प्रदेश असल्याने भाऊसाहेबांना कोणीच मदत केली नाही. जाट व शीख अब्दालीच्या धाकाने दूर राहिले तर रजपूत लोक मराठ्यांचा द्वेषच करीत होते.

लढाईतील दोन्ही बाजू मागासलेल्या होत्या. एका बाजूला लढाईचे अधिकृत वर्णन लिहून ठेवणारा कोणी जिवंत राहिला नव्हता तर दुसरी बाजू जय मिळाल्यानंतर त्यांचे वर्णन लिहून ठेवण्याइतकी ती सुधारलेली नव्हती. पळून आलेल्या लोकांनी आपलेच वर्तन कसे योग्य होते हे दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. जय झालेल्या बाजूने लिहताना अतिशोक्ती, सत्याची चाड न बाळगणे इत्यादी दोष दिसून येतात. त्यामुळे पानिपतच्या संग्रामाचे स्वरुप विषद करताना अनेक वेळा धाडसाचे वाटते. अशा स्थितीत इतिहासकाराला मागाहून मिळालेली माहिती, अपुरे वृत्तान्त, विशिष्ट व्यक्तींच्या आठवणी, सहेतुक

लिहलेल्या बखरी यावरच अवलंबून राहवे लागते. कोणालाच संपूर्ण घडामोडीचे दर्शन अशक्य होते. अशा परिस्थितीत शक्य तितक्या अस्सल साधनांचा वापर करुन पानिपतच्या संग्रामाविषयी लिहण्याचा प्रयत्न करावा लागतो.

## ▪ पानिपतच्या युद्धाची कारणे :–

पानिपच्या युद्धाचे स्वरुप पाहिल्यानंतर या युद्धास कोणती परिस्थिती कारणीभूत ठरली. याचा विचार केल्यास असे दिसून येते की, या युद्धाची बीजे दहा–वीस वर्षामागील घटनात आढळतात. एकातून दुसरे कारण निर्माण होऊन बनलेल्या कारण मालिकेची परिणती म्हणजे तिसरे पानिपत युद्ध होय. त्यामुळे युद्धकारणांचा सखोल अभ्यास होणे जरुरीचे आहे. पानिपत प्रकरणाचा अभ्यास करताना काही अभ्यासकांना शिवकालापासून अभ्यास करणे जरुरीचे वाटते. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या युद्धकौशल्यापासून राजनीती कौशल्याचा अभ्यास करुन पानिपत प्रकरणाची कार्यमिमांसा शोधण्याचा प्रयत्न काहींनी केला आहे. प्रस्तुत युद्धकारणांचा विचार करताना तत्कालीन बखरी, फारशी ग्रंथ व अगदी अलीकडील काळात संशोधन करुन काढलेल्या युद्ध कारणांचा विचार केला आहे. त्यादृष्टीने प्रथम इतिहास संशोधकांनी (इतिहासकारांनी) सांगितलेल्या कारणांचा विचार करु.

**इतिहास संशोधकांनी सांगितलेली पानिपतच्या युद्धाची कारणे :–**

अस्सल कागदपत्रे व ऐतिहासिक साधनांच्या आधारे अनेक इतिहास संशोधकांनी पानिपत प्रकरणावर दृष्टीक्षेप टाकला आहे. यात प्रामुख्याने त्र्यं.शं.शेजवळकर, इतिहासाचार्य–राजवाडे, रियासतकार–गो.स.सरदेसाई, श.ना. जोशी, सरदार आनंदराव फाळके, सेतुमाधवराव पगडी यांचा समावेश आहे. त्यांनी सांगितलेली कारणे पाहू–

प्रा.शेजवळकर यांनी सांगितलेली कारणे :–

प्रा.शेजवळकर इतिहासाचे गाढे अभ्यासक आहेत त्यांनी लिहलेल्या ''पानिपत १७६१'' या पुस्तकातील 'अटकेपार' या पहिल्याच प्रकरणात म्हणतात– ''पेशव्यांच्या राजकारणाचा दुष्परिणाम म्हणजे जुने शत्रू समूळ नाहीसे न होता त्यात वर नव्या शत्रूची भर पडायची. राघोबाच्या सन १७५४ च्या दिल्लीच्या पहिल्या स्वारीत मराठ्यांनी नादिरशहाची घालमेल केली. यात मराठ्यांना फायदा असा काहीच झाला नाही. नवीन वजीर इमाद याने खर्चासाठी ८० लाख रुपये देण्याचे कबूल केले तेही पैसे दिल्लीत राहून वसूल झाले नाहीत. याच प्रकरणात इमादचा हस्तक म्हणून नजीबखान उदय पावला. व तो अखेर मराठ्यांचे राजकारण ग्रासणारा काळराहू ठरला. याच नजीबखानाच्या बंदोबस्तासाठी दत्ताजी शिंदे मारला गेला. व दत्ताजीच्या वधाचा सूड घेणे हे पानिपतच्या युद्धातील प्रमुख कारण होय.''[२]

आग्र्यापर्यंतचा मुलूख लुटून अब्दाली ससैन्य अफगाणिस्तानात गेला होता तेंव्हा जळून खाक झालेल्या या प्रदेशात राघोबा अवतरला. अब्दालीचा हस्तक जो नजीबखान होता त्यास त्याने दिल्लीतून हाकलून लावले व दिल्ली ताब्यात घेतली. तिथे काहीच फायदा झाला नाही उलट अब्दालीची पीडा जवळ केली.

एकंदर पाहता संपूर्ण दक्षिण मराठ्यांची करण्यापूर्वी नर्मदा ओलांडणे ही पेशव्यांच्या राजकारणातील पहिली चूक होय. चंबळेपर्यंत पोहचल्यावर त्यापलिकडे जाऊन दिल्लीच्या राजकारणात हात घालणे ही दुसरी चूक. व त्यानंतर अंबाल्याच्या पुढे जाऊन गुप्त व लुप्त सरस्वती ओलांडणे ही तिसरी चूक. या चुकांचा परिपाक म्हणजेच पानिपत प्रकरण होय.

इतिहासाचार्य राजवाडे :–

मराठ्यांनी पंजाबमधील अब्दालीच्या हस्तकाला हाकलून दिले व अब्दालीचे संकट ओढवून घेतले. एवढेच कारण त्यांनी ऐतिहासिक प्रस्तावना या ग्रंथामध्ये दिले आहे.

सरदार आनंदराव फाळके :–

यांनी 'शिंदेशाहीचा इतिहास' नावाचा ग्रंथ लिहला त्यात ते म्हणतात– ''मराठ्यांनी रजपूतांना दुखाविल्यामुळे त्या रजपूत राजेरजवाड्यानी अब्दालीस पाचारण केले.''[३] हे कारण दिले आहे.

गो.स. सरदेसाई :–

यांनी दिल्लीच्या कारभारात मराठ्यांचा शिरकाव झाला व मोगलांचा निःपात इराणच्या हद्दीपासून बंगालच्या सागरापर्यंत एकजात पठाणशाही निर्माण करण्याचा जो प्रचंड उद्योग सुरु होता त्याला आळा घालण्याचे काम मराठ्यांनी स्विकारले, असे अप्रत्यक्ष कारण दिले आहे.

आधुनिक इतिहासकारांनी अप्रत्यक्षरित्या सांगितलेली कारणे पाहिल्यानंतर मराठी बखर ग्रंथातून आलेल्या युद्ध कारणांचा विचार करु.

**मराठी बखर ग्रंथातील युद्धकारणे :–**

पानिपतच्या युद्धाचा संदर्भ आलेल्या एकूण १५ बखरी उपलब्ध आहेत. त्यातील ९ बखरी युद्धवर्णन सांगणाऱ्या आहेत. तर उर्वरीत ६ बखरी चरित्रात्मक आहेत. एकूण १५ पैकी ३ बखरीतून पानिपतच्या युद्धाची कारणे आलेली आहेत. त्या बखरीतील कारणांचा विचार करु.

१) भाऊसाहेबांची कैफियत :–

अफगाणांनी दिल्ली घेऊन त्यांच्याच मर्जीने बादशहा बसविला तर मराठ्यांचा पूर्णपणे अंमल बुडेल म्हणून अब्दालीला दिल्लीला येऊ न देता त्याला दिल्लीच्या वाटेवर अडवून त्याला परत पाठवायचे. या उद्देशाने दत्ताजी शिंदे याने अब्दालीशी लढाई केली त्यात दत्ताजी शिंदे मारले गेले. अब्दालीने दिल्ली घेऊन दक्षिणेवर चाल करुन येण्याची शक्यता असल्याने अब्दालीची स्वारी उत्तरेत सोपविण्यासाठी सदाशिवराव भाऊ उत्तरेला निघाले.

२) रघुनाथ यादव कृत – पानिपतची बखार :–

या बखरीत मराठ्यांनी उत्तर मोहिम काढण्यामागे प्रमुख कारण म्हणजे भाऊसाहेबांना स्वारीवर जायचे होते. याशिवाय त्यांना काबुल कंदाहारवर विजय मिळवून तिकडेच राज्य करायचे होते. अब्दाली अटक नदी उतरुन आला होता त्यालाही अटकेपार हाकलून द्यावे असे कारण दिले आहे.

३) भाऊसाहेबांची बखार :–

सर्वात अधिक माहिती देणारी व भाषेच्या दृष्टीने सर्वांगसुंदर अशी बखार आहे. यात प्रामुख्याने दत्ताजी शिंदे याच्या वधाचा बदला घेण्यासाठी मराठ्यांनी दिल्लीकडे प्रयाण केले असे कारण आलेले आहे. मराठ्यांचे उत्तर मोहिमेचे कारण सांगतानाच उत्तरेतील मुसलमानानी अब्दालीस हिंदुस्थानात कशासाठी बोलाविले. याचे कारण सदर बखरीत आले आहे. मराठीतील इतर कोणत्याही बखरीने अब्दाली भारतात येण्याचे कारण विषद केले नसल्याने भाऊसाहेबांच्या बखरीतील कारणांचा विस्तृत विचार करणे संयुक्तिक ठरते. त्या दृष्टीने पुढील कारणांचा विचार करु.

''मुसलमानीस तांबेरा आला, सर्वत्र बामणी पातशाही झाली. पातशहा, वजीर व वरकड अधिकारी मराठ्यास मिळून अब्रू रक्षून आहेत. सर्व मेल्यागत हे उचित नाही. यापेक्षा पातशाही आपल्या हातून दुसऱ्यास द्यावी.''[८] या उद्देशाने अब्दालीस बोलाविण्यात आले.

वरील तिन्ही बखर ग्रंथातील कारणांचा विचार करता असा निष्कर्ष निघतो की, दत्ताजी शिंदे यांच्या वधाचा बदला घेणे क्रमप्राप्तच होते. कारण दत्ताजी शिंदे हा मराठा सरदार मराठी राज्याचा फार मोठा आधार होता. चाळीस हजार पर्यंत सैन्य बाळगून पेशव्याच्या कर्जाचा बोजा स्वतःवर घेणारा श्रेष्ठ सरदार पानिपत युद्धातील पहिला सेनापती होता. त्याला मारणाऱ्या शत्रूच्या पराभवार्थ निघणे हे क्रमप्राप्तच ठरते. दत्ताजीच्या वधाचा बदला घेतल्याने मराठ्यांची दिल्लीतील सत्ता कायम राहिली असती. याशिवाय माळवा प्रांतावरील व दक्षिणेवरील अब्दालीचे संकट आपोआप टळले असते. दिल्लीतील मराठ्यांची सत्ता ही मोघली पातशाहीवरील तांबेरा समजून अब्दालीला बोलविणाऱ्या रोहिल्यांना अटकपार

घालविणे व त्यामुळे दिल्लीची पातशाही दुसऱ्यास देऊन टाकण्याचा प्रश्नच निकालात काढणे. असाच कारणांचा अप्रत्यक्षरित्या निष्कर्ष निघतो.

बखरग्रंथातील कारणांचा विचार करताना प्रमुख्याने भाऊसाहेबांनी उत्तर मोहिमेवर जाण्याचेच कारण हे पानिपत युद्धाचे कारण म्हणून बखरकारांनी सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

रघुनाथ यादव कृत पानिपतची बखर सांगते– 'भाऊसाहेबांना स्वारीवर जायचे होते. याशिवाय त्यांना काबुल–कंदाहारवर विजय मिळवून तिकडेच राज्य करायचे होते.' मात्र १६ फेब्रुवारी १७६० रोजी दत्ताजीच्या वधाची बातमी दक्षिणेत समजली तेंव्हा मराठी सैन्य उद्गीर येथे निजामाचा पराभव करुन आनंदोत्सव साजरा करीत होते. यापूर्वी जयाप्पा शिंदे याचा खून होऊन तो मराठी राज्याच्या कामास आला होता. दत्ताजीच्या मृत्यूनंतर मल्हारराव होळकर यांचाही अब्दालीच्या सैन्याकडून पराभव झाल्याने उत्तरेकडील विस्कटलेली घडी नीट बसवून उत्तरेकडील मराठी सत्ता पुन्हा प्रस्थापित होण्यासाठी कोणीतरी कर्तबगार व शूर मुत्सद्दयास उत्तरेत जाणे गरजेचे होते. याशिवाय उत्तरेतूनही खुद्द पेशवे किंवा भाऊसाहेब यांनी यावे अशी मागणी होती. यावेळी पेशवा उत्तरेत जाण्यास अनुत्सुक असल्याने रघुनाथराव दादांचे नाव पुढे आले, मात्र यापूर्वीच्या उत्तर स्वारीत कर्ज झाल्यामुळे व पुन्हा मोहिमेसाठी पैशाची मागणी केल्यामुळे रघुनाथराव दादाच्या ऐवजी भाऊसाहेबांचे नांव पुढे आले. यापूर्वीच उद्गीरचे युद्ध भाऊंच्या नेतृत्वाखाली झाल्याने भाऊसाहेबांची शिस्त व करारीपणा सर्वांना परिचित असल्याने भाऊसाहेबांनी उत्तर मोहिमेवर जाण्याचा निर्णय झाला.

मराठी बखरग्रंथातील कारणे पाहिल्यानंतर फारशी ग्रंथातून आलेल्या कारणांचा विचार करणे गरजेचे आहे. अब्दाली भारतात येण्याचे कारण सांगतानाच मराठ्यांनी उत्तर मोहिम का काढली? याची कारणे दिली आहेत. त्या दृष्टीने फारशी ग्रंथातून आलेली युद्धकारणे पाहू.

**फारशी ग्रंथातून आलेली पानिपतच्या युद्धाची कारणे :-**

मराठी बखरग्रंथापेक्षा ऐतिहासिक काळातच फारशी ग्रंथातून पानिपत प्रकरणावर जास्त लेखन झाले आहे. फारशी ग्रंथाचे मराठी भाषांतर झालेले एकूण २३ ग्रंथ आहेत. त्यापैकी सहा ग्रंथातून प्रत्यक्षपणे तीनच युद्धकारणे आलेली आहेत. २३ पैकी १६ ग्रंथ हे मुसलमान लेखकांनी लिहलेले आहेत. ४ ग्रंथ युरोपियन लेखकांनी लिहले आहेत तर ३ भारतीय लेखकांनी लिहलेले आहेत. प्रथम अब्दाली भारतात येण्याच्या कारणांचा विचार करु .

१) मिराते अहमदी :-

''मराठ्यांनी मिर्जासिंगाला शहाजहान या नावाने दिल्लीच्या गादीवर बसविले. त्याचा सूड घेण्यासाठी अब्दाली आला.''[५] हे कारण दिले आहे.

अली अहमद हा मोघल काळात गुजरात प्रांताचा दिवाण होता. १७६१ च्या शेवटी त्याने फारशी भाषेत ''गुजरातचा इतिहास'' लिहला. त्याचे मूळ नांव ''मिराते अहमदी'' असे आहे. पानिपत वरुन पळून आलेल्या लोकांकडून मिळालेल्या माहितीवरुन त्याने आठ महिन्यांनी म्हणजे १७६१ मध्ये ग्रंथ लिहला आहे. त्यामुळे या कारणांचा सविस्तर विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

२९ नोव्हेंबर १७५९ रोजी आलमगीर (दुसरा) मारला गेला. यानंतर शहाजहान ३ रा (याचे मूळ नांव मुहिउद्दीन) तो गादीवर आला. तर अब्दालीची स्वारी १७५९ च्या आक्टोंबर महिन्यात झाली. म्हणजे नोव्हेंबर महिन्यात गादीवर बसलेल्याच्या बदल्यासाठी आक्टोबर महिन्यात येणे पूर्णपणे विसंगत वाटते. शहाजहानच्या पूर्वीचा बादशहा २ रा आलमगीर हा मराठ्यांचा पक्षपाती व अब्दालीचा द्वेष्टा असलेल्या गाजीउद्दीनानेच बसविलेला होता. त्याच्या काळात अब्दाली भारतात आला मात्र सूड घेण्यासाठी अब्दाली आला हे म्हणजे चुकीचे वाटते.

२) खजानाये आमिरा :-

मराठ्याकडून पंजाबात पराभूत झालेले अफगाण व हिंदुस्थानातील अफगाण आणि राजेरजवाडे यांच्या निमंत्रणावरुन रोहिल्यांच्या रक्षणाकरिता व सर्वसाधारणपणे इस्लाम संरक्षणाकरीता अब्दाली पंजाबात अवतरला. हे कारण दिले आहे. हेच कारण ''डौकृत हिंदुस्थानचा इतिहास'', नजीबखानाचा चरित्र ग्रंथ ''अहवाले नजीबउद्दौला'' व काशिराजाच्या बखरीवरुन लिहलेल्या ''निगार नामाये हिंद'' या ग्रंथातून आले आहे.

''खजानाये अमिरा'' हा पानिपतच्या युद्धानंतर तीन वर्षांनी लिहलेला आहे. तर ''डौकृत हिंदुस्थानचा इतिहास'' हा युद्धानंतर सहा वर्षांनी लिहलेला आहे. तर नजीब चरित्र २६ वर्षांनी लिहले आहे. वरील तीन ग्रंथातून मांडलेले कारण थोड्याफार फरकाने समर्पक वाटते. जुलै १७५९ मध्ये अब्दालीने जहानखानाच्या नेतृत्वाखाली लाहोरवर फौजा पाठवल्या. पण साबाजी शिंदेने त्याचा पराभव केला, जहानखान जखमी होऊन पळाला त्यात त्याचा पुत्र व दोन हजार सैन्य मारले गेले. त्यामुळे अब्दालीने संतप्त होऊन पाचवी स्वारी काढली. हे ऐतिहासिक दृष्ट्या पूर्ण बरोबर आहे. याच कारणातील 'रोहिल्यांच्या संरक्षणासाठी व इस्लाम संरक्षणासाठी' अब्दालीचे येणे दिले आहे. वरवर विचार करता हे कारण योग्य वाटते परंतु इस्लाम संरक्षण हे तत्त्व प्रतिष्ठित मुसलमानांच्या इच्छेस जुळते.

३) शहाआलमच्या कारकिर्दीचा इतिहास :-

अठराव्या शतकात फ्रँकलिन नावाचा एक लष्करी अधिकारी ईस्ट इंडिया कंपनीत कॅप्टनच्या पदावर कामाला होता त्याने १७९८ मध्ये हा ग्रंथ लिहला. युद्धानंतर ३७ वर्षांनी लिहला असला तरी ऐतिहासिक दृष्ट्या तो महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. त्यात विश्वासरावाने अब्दालीला सुचविले की, नादिरशहाच्या काळात झालेला तह कायम रहावा. ही सूचना अब्दालीने तिरस्कारिली व उलट मराठ्याकडेच मागणी केली की तुम्ही आपल्या मुलकात परत जावे. पुन्हा नर्मदा ओलांडू नये. माझी सत्ता करनाल-पानिपत पर्यंत

चालावी. साम्राज्याचा वसुल बादशाही अधिकाऱ्यांनी करावा. आणि त्यांनी मराठ्यांना चौथाईची ठरलेली रक्कम द्यावी. मराठ्यांनी वसुलीच्या कामात लक्ष घालू नये. असे कारण आले आहे.

या कारणाचा विचार करताना असे लक्षात येते की, नादिरशहाच्या काळात झालेला तह मराठ्यांना अपेक्षित आहे. पण मोगलांची पातशाही सत्ता रोहिल्यांना हवी आहे. अब्दालीचीसुद्धा तीच इच्छा होती. विशेषतः मराठ्यांचे वर्चस्व नको होते. आणि मोगली किंवा हिंदुस्थानातील सुभे किती तेही ठरवायचे होते. या दोन–तीन दुय्यम कारणांचा समावेश तिसऱ्या मुख्य कारणांत समाविष्ट आहे. त्यामुळे असे लक्षात येते की, अब्दालीचे येण्याचे मुख्य कारण म्हणजे मराठ्यांचे वाढते राजकीय वर्चस्व नाहीसे करणे होय.

अब्दालीच्या येण्यामागील हेतू पाहिल्यानंतर मराठ्यांविषयी फारशी ग्रंथातून काय लिहले आहे हे ध्यानात घेणे इष्ट ठरते. त्या दृष्टीने वेगवेगळ्या ग्रंथातून आलेली कारणे पाहू.

१. गाजीउद्दीन, सूरजमल जाट व मल्हारराव होळकर यांची नजीबखानामार्फत चाललेली तहाची बोलणी फिसकटली. हे कारण दिले आहे.

२. तारीखे सुलतानी व जुले रहमत :–

या दोन्ही ग्रंथातून दत्ताजी शिंदे यांच्या वधाचा सूड घेणे, अफगाणेत्तर मिळून अफगाणांचा पराभव करणे व कंदाहारला जाऊन विजय मिळविणे हे संयुक्त कारण दिले आहे.

३. शहाआलमनामा व तारीखे फैजबक्ष :–

पंजाब प्रांतातील मराठे अब्दालीकडून पराभव पावून परत आले. मराठ्यांचा प्रदेश रोहिल्यांनी घेतल्याने मराठे निराधार झाले. तो प्रदेश परत मिळविण्यासाठी असे एकच कारण दिले आहे.

४. हरिपूर व ज्वालापूर ही हिंदूंची तीर्थ क्षेत्रे नजीबखानाने दिली नाहीत.

५. शहाआलमच्या कारकिर्दीचा इतिहास :–

नादिरशहाच्या वेळेचा तह पाळावे हे विश्वासरावाचे म्हणने अब्दालीने ऐकले नाही.

14074

A

६. तारीखे हुसेनशाही :–

इस्लामियांचा मोड करणे, अब्दालीशी युद्ध करुन विश्वासराव यास हिंदुस्थानचा बादशहा करणे व जुम्मा मशिदीचे मंदिर करणे.

७. डौकृत हिंदुस्थानचा इतिहास :–

हिंदूच्या राज्याची पुन्हा स्थापना करणे. हे एकच कारण दिले आहे.

ही वरील सहा कारणे दिली आहेत. यातील क्र १,३,५, या कारणांची यापूर्वीच सविस्तर चर्चा केली आहे. यातील क्र.२ च्या कारणामधील अफगाणेत्तर मिळून अफगाणांचा पराभव करणे हा हेतू पेशव्यांचा दिसतो. मात्र कंदाहारला जाऊन विजय मिळविणे हे चुकीचे वाटते. कारण अफगाणिस्तानमधील डोंगराळ व दुर्गम भागात राज्य करणे हे मराठ्यांच्या दृष्टीने फायदयाचे नव्हतेच. हरिपूर व ज्वालापूर ही हिंदूंची तीर्थक्षेत्रे मराठ्यांना मिळावी ही पेशव्याची मागणी होतीच. तर सहाव्या कारणातील इस्लामीयांचा मोड करणे ही विधान अतिशयोक्ती वाटटे. दिल्ली येथील मोगल सत्ता रक्षण करणे हा पेशव्यांचा हेतू होता. म्हणून तर त्यासाठी दत्ताजी शिंदे मारला गेला. तसेच विश्वासरावांस दिल्लीचा बादशहा करणे हे कारण दिले असले तरी, भाऊसाहेबांनी दिल्ली जिंकली तरी त्या ठिकाणी नसलेल्या अलीगोहर नावाच्या शहजादयास बादशहा म्हणून घोषित केले. याशिवाय जुम्मा मशिदेचे मंदिर करणे व हिंदूंच्या राज्याची पुन्हा स्थापना करणे हेही विधान चुकीचे वाटते.

मराठी व फारशी ग्रंथाच्या कारणांचा विचार केल्यावर असे लक्षात येते की, दिल्लीतील मोगल बादशाहीवर कोणाचे वर्चस्व ठेवायचे. मोगलबादशाही रोहिल्यांच्या सल्ल्याने चालावी ही अब्दालीची व रोहिल्यांची इच्छा दिसते तर मोगलबादशाही मराठ्यांच्याच तंत्राने चालावी ही मराठ्यांची इच्छा दिसते. यातूनच पानिपतच्या युद्धाचे बीजारोपण झाले असल्याचे आढळून येते.

इतिहासकारांनी सांगितलेली कारणे व बखर ग्रंथ व फारशी ग्रंथातून आलेल्या कारणांचा विचार करता असे लक्षात येते की, शिवाजीमहाराजांच्या काळापासून मराठ्यांनी हिंदू राज्य स्थापन करण्याचे

ध्येय आपल्या डोळ्यासमोर ठेवले आहे. पेशव्यांनी दक्षिणेतून येऊन उत्तर हिंदुस्थानच्या राजकारणात मराठ्यांनी प्रवेश करताच पूर्वापार असलेल्या अनेक राजे, महाराजांना व रोहिल्यांना मराठ्यांचा प्रवेश नकोसा वाटला. सत्तेसाठी त्यातूनच मराठ्यांशी संघर्ष उद्‌भवला.

मराठ्यांनीही दिल्लीच्या राजकारणात सक्रिय होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे 'अहमदिया करार' होय. दिल्लीच्या मुघल बादशहाची ताकद कमकुवत झाल्याने तेथील प्रांतीय सुभेदार व सरदारांनी स्वतंत्र राज्य स्थापन्याचा प्रयत्न केला. तर परकीय शत्रूंनी देशावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली, नादिरशहा, अहमदशहा अब्दाली यांच्या स्वाऱ्या हे त्यापैकीच होत. मोगली सत्तेचं संरक्षण करणारी एकमेव सत्ता महाराष्ट्रात होती त्यामुळेच मोगल बादशहाने इतरांपासून संरक्षण मिळावे म्हणून मराठ्यांची मदत घेतली. मात्र उत्तर हिंदुस्थानात सर्वांनाच आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित करावयाचे असल्याने पानिपतच्या युद्धाचे बीजारोपण झाले.

पंजाबचा हक्क हेही पानिपतच्या युद्धाचे आद्य कारण ठरते. अब्दालीने अनेक स्वाऱ्या करुन पंजाबवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्याला दिल्लीची बादशाही नको होती तर हिंदुस्थानच्या संपत्तीने अफगाणिस्तानचे दारिद्रय दूर करायचे होते. अब्दालीच्या हातातून पंजाब काढून घेण्यासाठी रघुनाथराव दादाने व इतर मराठे सरदारांनी अटकेपार स्वाऱ्या केल्या होत्या. त्याचे शल्य अब्दालीला होतेच. म्हणजेच पंजाबच्या मालकी हक्कावरुन मराठे व अब्दाली यांच्यात संघर्ष निर्माण झाला.

## ■ पानिपतच्या युद्धाचे दुष्परिणाम :—

पानिपतचे तिसरे युद्ध ही जगाच्या इतिहासातील एक क्रांतीकारक घटना होती. अनेक शतकांच्या घटनांचा विचार करता पानिपत हे नाव त्यात येते. या युद्धामुळे मराठी सत्तेला जबरदस्त हादरा बसला. मात्र या युद्धामुळे मराठी सत्तेच्या भवितव्यावर परिणाम झाला किंवा नाही यात इतिहासकारात मतभिन्नता

आढळते. ''पानिपत युद्धामुळे मराठ्यांचे सार्वभौम सत्ता स्थापन्याचे प्रयत्न कायमचे नष्ट झाले.''[६] असा निष्कर्ष गो. स. सरदेसाई यांनी काढला आहे. मात्र हा ऐतिहासिक पुराव्यावर आधारलेला नाही असे वाटते. मराठ्यांच्या पराभवानंतर मराठ्यांचे राज्य संपले की काय असा आभास उत्तरेत चार दोन वर्षे निर्माण झाला. मात्र अब्दाली जाताच मल्हारराव होळकरांनी आपले पूर्व उद्योग सुरु केले. ज्या पनिपतच्या भूमीत संबंध एक मराठा पिढी कापली गेली त्याच पानिपताने नवीन पिढीच्या नाना फडणीस व महादजी शिंदे यांना पुनर्जन्म देऊन मराठी राज्य पूर्ववत चालू ठेवले. माधवराव पेशव्यांचे चुलत्याशी वैर उद्‌भवले म्हणून पूर्वस्थिती प्राप्त होण्यास थोडा विलंब लागला. माधवराव पेशव्यांचे नेतृत्व लाभताच मराठी राज्य पूर्ववत चहुकडे चालू झाले. पानिपतचे कार्य संपण्यापूर्वीच मल्हारराव होळकराने रजपूतांचा पाडाव केला तर गोविंदपंत बुंदेले यांच्या पुत्राने बुंदेलखांड, अंतर्वेद या ठिकाणचे आपले हक्क पहिल्यासारखे चालू ठेवले.

पानिपतच्या पराभवाने महाराष्ट्रावर दुःखाची छाया पसरली असली तरी तत्कालीन होती. म्हणून इव्हॅन्स बेल हा इतिहास संशोधक म्हणतो– ''पानिपतची लढाई सुद्धा मराठ्यांना अभिमानास्पद व कीर्तीस्पद अशीच घटना होती. 'सर्व मराठे हिंदी लोकांसाठीच हिंदुस्थान' या ध्येयासाठी लढले. पण दिल्ली, अयोध्या व दख्खान येथील प्रबल मुसलमान मात्र यावेळी कारस्थाने करीत आपल्या चैनीत दंग होऊन एका बाजूस बसले. आणि जरी मराठ्यांचा युद्धात पराजय झाला असला तरी अफगाण एकदा गेले ते परत कधी दिल्ली राजकारणात ढवळाढवळ करण्यासाठी आले नाहीत.''[७] युद्धात प्रचंड मनुष्यहानी झाली. रियासतकार गो. स. सरदेसाई यांच्या मते या युद्धात पाऊण लाख मराठे मारले गेले असावेत तर प्रा.शेजवळकर यांनी दोन लाख माणसे मेली असावीत असा अंदाज व्यक्त केला आहे. एकंदर पाहता पानिपत पराभवाने मराठी सत्तेचं प्रचंड नुकसान झाले. पण खच्चीकरण मात्र झाले नाही. मराठी सत्तेला हादरा बसला परंतु ती कोलमडून पडली नाही.

युद्धानंतर मात्र मुघलसत्ता दुबळी झाली. दिल्लीच्या गादीवर मुघल बादशहा असला तरी त्याला दुसऱ्याच्या हातातील बाहुले म्हणून वागावे लागले. १७६१ नंतर त्याने दिल्ली शहरात ११ वर्षे कधी प्रवेश केला नाही. १७७२ मध्ये ज्यावेळी त्याने दिल्ली शहरात प्रवेश केला तेंव्हा त्याच्या हातात सत्ता नव्हती.

मोगलबादशाही खिळखिळी झाल्याने व मराठ्यांची पूर्ववत घडी बसण्यास काही दिवसांचा कालावधी लागला. या कालावधीत मराठ्यांना प्रजाब प्रांताकडे लक्ष देता आले नाही. तर अब्दालीही परत कधी दिल्लीकडे आला नाही त्यामुळे पंजाबात शिखांनी उचल खाऊन आपली सत्ता स्थापन केली. ज्या पद्धतीने पंजाबकडे लक्ष देता आले नाही त्याप्रमाणे कर्नाटक प्रांतातही मराठ्यांना हालचाल करता आली नाही. त्यामुळे हैदरअलीने म्हैसूरचे मराठी राज्य नष्ट करुन आपली सत्ता सुरु केली. पानिपत झाले नसते तर हैदरअलीला मराठ्यांनी पुढे येऊ दिले नसते. त्याचपद्धतीने जंजिऱ्याच्या सिद्दीने उचल खाल्ली तर उद्‌गीरच्या युद्धात गमावलेला प्रदेश परत घेण्यासाठी निजामाने प्रयत्न सुरु केले.

पानिपत संग्रामाचे अप्रत्यक्षरित्या किती दूरगामी परिणाम झाले हे सहसा कोणाच्या लक्षात येत नाही. मराठी सत्ता हळूहळू वाढत होती तर मुस्लीम सत्ता खालावत होती. पण या स्पर्धेत तिसरी एक पाश्चात्य सत्ता नुकतीच डोके वर काढू पाहत होती. त्या नवीन सत्तेचे दोन प्रतिस्पर्धी हिंदू–मुसलमान आपआपसात भांडून दुर्बल झाले होते. हा प्रकार इंग्रजांस इष्ट वाटला. अर्काटच्या व प्लासीच्या लढाईने इंग्रजांचा जम कर्नाटकात व बंगालमध्ये बसला. क्लाईव्हने १७६४ च्या युद्धात बंगालचा बादशहा नबाब व वजीर यांचा पराभव करुन हिंदुस्थानात ब्रिटीश साम्राज्याचा पाया घातला. तर पाटणा येथील शहाअलम इंग्रजांचा आश्रय मागू लागला.

ज्याप्रमाणे परकीय शत्रूने जशी उचल खाल्ली तशीच स्वकीय शत्रूने उचल खाल्ली. पानिपतच्या युद्धात प्रमुख मराठे सरदार मरण पावल्याने राजकारणात कर्तबगार माणसांचा तुटवडा जाणवू लागला. त्यामुळे रघुनाथरावसारख्या कर्तृत्वशून्य आणि चंचल माणसाला राजकारणात पुढे येण्याची संधी मिळाली. तर पेशवे भाऊंच्या व विश्वासरावांच्या मृत्यूने खचून गेले व त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

पानिपतच्या युद्धात अब्दालीला विजय मिळाला असला तरी त्याला फायदा अत्प थोडाच झाला. त्याची मनुष्यहानीही खूप झाली व ज्या पंजाब प्रांतासाठी वारंवार तो हिंदुस्थानात आला तो प्रांतही त्याच्या ताब्यातून निसटून गेला.

पानिपतमध्ये मराठ्यांचा पराभव झाला असला तरी मराठ्यांची किर्ती त्यामुळे सर्वत्र पसरली तर आजही त्या युद्धाचा अभिमान मराठ्यांस वाटतो. पानिपतवरुन पळून जाऊन मराठ्यांना थोडेफार प्राण वाचविता आले असते परंतु त्यांच्या माथ्यावर कायमचा कलंक लागला असता. ते टाळून त्यांनी निश्चयाने रणकुंडात उडी घेऊन पराक्रम गाजवला त्यामुळे त्यांचा दरारा कायम राहिला. त्यामुळेच प्रिंसिपॉल रॉलिन्सन म्हणतात – ''विशिष्ट परिस्थितीचा विचार करता इतिहासातील एखादा पराजय विजयाइतकाच सन्मानदायक म्हणावा लागतो. मराठ्यांच्या इतिहासात त्यांच्या फौजेने राष्ट्रातील सर्व उत्तम शिलेदारासह पानिपतच्या घनघोर रणक्षेत्रात आपल्या देशाच्या, धर्माच्या वैऱ्याशी लढताना जे मरण पत्करले त्याहून जास्त यशदायक मरण इतिहासात क्वचितच नोंदले गेलेले असेल.''[८]

मात्र युद्धाने मराठ्यांना आपल्या शत्रूची जाणीव अधिक तीव्रतेने झाली. त्यामुळे पुढील धोरणे आखताना त्यांनी दक्षता घेतली. सैन्याच्या व शस्त्रास्त्रांच्या कमकुवतपणाची जाणीव होऊन पुढील काळात मराठा सरदारांनी शिस्तबद्ध व आधुनिक शस्त्रास्त्रांनी सैन्य सुसज्ज करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यामुळेच इंग्रजांना मराठी सत्तेच्या राजकारणात व प्रदेशात वर्चस्व प्रस्थापित करण्याची संधी लवकर मिळाली नाही. अशा पद्धतीने मराठी सत्तेवर पानिपतच्या युद्धाचे असे तत्कालिक व काही दीर्घकालीन परिणाम झाले.

## ■ निष्कर्ष :–

१. पानिपतच्या लढाईस कोणती परिस्थिती कारणीभूत झाली याचा विचार केल्यास असे दिसते की या युद्धाची बीजे दहा–वीस वर्षे पाठीमागील घटनांत आढळतात. एकातून दुसरे व दुसऱ्यातून तिसरे अशी कारणे निर्माण होऊन तिसरे पानिपत युद्ध झाले.

२. पानिपतच्या युद्धाची कारणे पाहताना मराठी बखार ग्रंथांनी मराठ्यांची बाजू संभाळलेली दिसते तर फारशी ग्रंथातून मुसलमानांची बाजू कशी योग्य होती हे सांगितले आहे.

३. पानिपत युद्धावर आधारित तत्कालिन १५ मराठी बखरी तर २३ फारशी ग्रंथ उपलब्ध आहेत. यातील बहुतेक बखरी व ग्रंथ चरित्रात्मक आहेत.

४. पानिपतच्या युद्धातील विजयामुळे अब्दालीस फारसा फायदा झाला नाही. युद्धात मनुष्यहानी खूप झाली. ज्या पंजाब प्रांतासाठी त्याने वारंवार हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या तो पंजाब प्रांत अखेर त्याला कायम स्वरुपी ताब्यात घेता आला नाही.

५. मराठ्यांचा युद्धात पराभव झाला असला तरी त्यांनी ज्या धैर्याने अब्दालीशी तोंड दिले त्याचा अभिमान मराठ्यांस आजअखेर वाटण्यासारखा आहे.

६. पानिपत युद्धाने मराठी सत्तेला प्रचंड नुकसान सोसावे लागले. पण त्याचवेळी मुघल सत्ता कमकुवत बनल्याने इंग्रज, हैदरअली व पंजाबमधील शिखांनी खूपच उचल खाल्ली.

७. मल्हारराव होळकराने नजीबला पाठीशी घातल्याने मराठ्यांचा कडवा दुष्मन मराठ्यांस डोईजड झाला व शेवटी तो मराठ्यांच्या नाशास कारणीभूत ठरला.

८. अब्दाली जेंव्हा शिवाजीमहाराजांच्या नीतीने युद्ध स्वाऱ्या करीत होता तेंव्हा मराठे मुघलांच्या पद्धतीने मोहिमा चालवत होते.

९. या मोहिमेत मराठ्यांनी वेगाने हालचाली न केल्याने शुजासारखा चांगले सैन्य बाळगणारा सेनानी शत्रू पक्षास मिळाला.

१०. उद्गीरची लढाई सोडली तर सदाशिवभाऊंस समोरासमोरील युद्ध करण्याचा तितकासा अनुभव नव्हता. शिवाय उत्तरेतील प्रदेशही त्याच्या दृष्टीने नवखा होता त्यामुळे, त्याला भौगोलिक परिस्थितीचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेता आला नाही.

११. मराठा सरदारात अंतर्गत वैमनस्य होते. त्यामुळे मराठा फौजेत एकसुत्रीपणा व एकविचार रुजला जात नव्हता. कडक शिस्त नसल्यामुळे सैन्यात व सरदारात ढिलेपणा होता.

१२. मराठ्यांचे सैन्य कमी होते तर अब्दालीचे सैन्य जास्त होते. युद्ध शस्त्रातही मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे जाणवते.

१३. मराठ्यांच्या हातून घडलेल्या अनेक चुका, मुत्सद्देगिरीचा अभाव, संघटनातील दोष या युद्धातून जाणवतो.

१४. या युद्धात मराठ्यांची संपूर्ण एक तरुण पिढी कापली गेली. त्या पिढीने निर्माण झालेली पोकळी भरुन काढण्यासाठी काही वर्षाचा कालावधी लागला.

१५. फारशी ग्रंथ व बखर ग्रंथातून अतिशयोक्ती जाणवते, स्थळ, काल व घटना यांत मोठ्या प्रमाणात तफावत आहे.

## ▪ तळटीपा :–

| | |
|---|---|
| १. त्र्यं.शं. शेजवलकर | 'पानिपत १७६१' |
| | जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे–२ |
| | प्रथमा – १४/०१/१९६१ |
| | पृ. १८८ |
| २. तत्रैव | पृ. १ ते २३ |
| ३. श. ना. जोशी | 'पानिपत रणसंग्राम' |
| | (नाना फडणीस यांचे शब्दात) |
| | संपादक– श.ना. जोशी, प्र. म. लिमये |
| | प्रकाशक – गो. जं. कुंटे, सांगली |
| | प्रथमा – १९६५ |
| | पृ. १३१ |
| ४. भीमराव कुलकर्णी | 'भाऊसाहेबांची बखार' |
| | सिटी बुक स्टॉल, पुणे. |
| | प्रथमा–१९६५ |
| | पृ.२५ |
| ५. श.ना. जोशी | 'पानिपतचा रणसंग्राम' |
| | (अनुवाद–मिराते अहमदी ) |
| | प्रकाशक – गो. जं. कुंटे, सांगली |
| | पृ.४५ |
| ६. गो. स. सरदेसाई | 'मराठी रियासत' |

(पानिपत प्रकरण १७४७–१७६१)

भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे

प्रथमा–१९३०

पृ.

७. त्र्यं. शं. शेजवलकर 'पानिपत–१७६१'

जोशी आणि लोखंडे प्रकाशन पुणे–२

प्रथमा – १९६१

पृ. २२१

८ तत्रैव पृ. २२१